आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकारच्या शपथविधीसाठी राजधानी दिल्ली सज्ज

- भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज महायुतीच्या नेत्यांशी चर्चा करणार

- काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज नवी दिल्लीत सुरू

- चित्रपट सृष्टीतले दिग्गज निर्माते दिग्दर्शक रामोजी राव यांचं निधन

**आणि**

- छत्तीसगडमध्ये बस्तर विभागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत काल सात माओवादी ठार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या नवीन सरकारचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे रविवारी संध्याकाळी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं होणार आहे. राष्ट्रपती संध्याकाळी सव्वासात वाजता नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील.

भारताचे शेजारी देश आणि इतर मित्रदेशांचे प्रमुख या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

उद्या होणाऱ्या शपथविधी समारंभाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी तिथली सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. याअंतर्गत नवी दिल्लीत कोणत्याही प्रकारचे ड्रोन, पॅराग्लायडर्स, हवाई तरंगते ग्लायडर्स किंवा अशा प्रकारची उपकरणं हवेत

उडवायला बंदी केली आहे. ही बंदी उद्या म्हणजे नऊ तारखेसाठी असली तरी दहा तारखेला देखील ती कायम असेल, असं दिल्ली पोलिसांनी कळवलं आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज संध्याकाळी दिल्लीत महाराष्ट्रातल्या युतीच्या नेत्यांशी चर्चा करणार आहेत. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी होईपर्यंत राजीनामा स्थगित करण्यास सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीत रालोआला महाराष्ट्रात अपेक्षित जागा न मिळाल्याची जबाबदारी घेत देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वर्षा शासकीय निवासस्थानी होणारी रालोआ मित्रपक्षांचे नेते आणि नवनिर्वाचित खासदारांची बैठक रद्द केली आहे. अमित शहा रालोआच्या नेत्यांना काय मार्गदर्शक सूचना देतात यासाठीची उत्सुकता वाढली आहे.

**<><><><><>**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज नवी दिल्ली इथं सुरू आहे. या बैठकीत लोकसभा निवडणुकीतल्या पक्षाच्या कामगिरीचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी उपस्थित आहेत. कार्यकारिणीच्या बैठकी शिवाय काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक आज संध्याकाळी होणार आहे. या बैठकीला पक्षाचे, लोकसभेचे सर्व नवनिर्वाचित खासदार आणि राज्यसभेचे सदस्य उपस्थित राहतील.

**<><><><><>**

तेलुगू देसम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू येत्या बुधवारी १२ जूनला आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. सकाळी अकराच्या सुमारास विजयवाडाजवळ गन्नावरम इथं हा शपथविधी सोहळा होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच एनडीएचे वरिष्ठ नेते आणि आंध्र प्रदेशच्या शेजारील राज्यांचे मुख्यमंत्री या समारंभाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. २०१४ मध्ये राज्याचं विभाजन झाल्यानंतर नायडू आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेणार आहेत. तेलगू देसम पक्ष, जनसेना आणि भारतीय जनता पक्षानं आंध्र प्रदेश विधानसभेच्या १७५ पैकी १६४ जागांवर विजय मिळवत विधानसभा निवडणुकीत बाजी मारली आहे.

**<><><><><>**

२१ जून या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या पार्श्वभूमीवर योगशास्त्राविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं विविध उपक्रमांचं आयोजन केलं आहे. माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू आणि आयुष मंत्रालय सचिव, वैद्य राजेश कोटेचा यांनी काल नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या तयारीचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. यानिमित्तानं आकाशवाणी आणि दूरदर्शन विविध कार्यक्रम आयोजित करणार असून त्यात योगाभ्यासातले तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. याशिवाय योग संदेशाचा प्रसार करण्यात प्रसारमाध्यमांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी सुरु केलेला ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस प्रसारमाध्यम सन्मान पुरस्कार’ देखील वितरित केला जाणार आहे. तर देशभरात “हर आंगन योग” या मोहिमेअंतर्गत अंगणवाड्या, शाळा, ग्रामपंचायती आणि सार्वजनिक ठिकाणी योगाभ्यास विषयक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

**<><><><><>**

चित्रपट आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातलं नामवंत व्यक्तिमत्व  रामोजी राव यांचं आज सकाळी हैदराबादमध्ये निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. श्वसनाला त्रास होत असल्यानं हैदराबादमधील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथंच त्यांचं निधन झालं. ईटीव्ही नेटवर्क आणि रामोजी फिल्मसिटीचे रामोजी राव प्रमुख होते.

दक्षिणेतल्या चित्रपट सृष्टीत त्यांचा दबदबा होता. तेलुगु प्रमाणेच कन्नड, तमिळ आणि मल्ल्याळम भाषेतल्या मिळून ६० चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. त्यात काही हिंदी चित्रपटांचा समावेश होता. सामाजिक प्रश्नांवर आधारित चित्रपट त्यांनी काढले. त्यातले प्रतिघात आणि नाचे मयूरी हे चित्रपट विशेष गाजले. नाचे मयूरीसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. याशिवाय चित्रपट सृष्टीत प्रतिष्ठेचे मानले जाणारे फिल्म फेअर आणि नंदी पुरस्कारही त्यांना अनेकदा मिळाले होते.२०१६ मधे त्यांना पद्मविभूषण ने सन्मानित करण्यात आलं होतं. अनेक नवोदित कलाकरांना त्यांनी आपल्या चित्रपटांमधून प्रकाशात आणलं.

चित्रिकरणाच्या सुविधांसाठी देशोदेशी नावाजला गेलेला रामोजी फिल्म सिटी हा स्टुडिओ त्यांनी उभारला. ईटीव्ही हा १३ भाषांमधला दूरचित्रवाहिन्यांचा समूह त्यांनी सुरु केला. देशातल्या दृक्श्राव्य माध्यमात खाजगी उद्योगाची ही पहिली मोठी झेप होती. या समूहातर्फे ई नाडू वर्तमानपत्रही प्रसिद्ध होतं.

**<><><><><>**

रामोजी राव यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. रामोजी राव यांच्या निधनामुळे देशानं माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातलं एक दिग्गज व्यक्तीमत्व गमावलं आहे. त्यांचं योगदान दीर्घकाळ लक्षात राहील, असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

तर रामोजी राव यांनी माध्यम क्षेत्रात क्रांती केली. माध्यम आणि चित्रपट क्षेत्रावर त्यांनी आपली अमिट छाप सोडली, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. रामोजी राव यांचे कुटुंबीय आणि मित्र परिवाराप्रति मोदी यांनी आपल्या सहवेदना प्रकट केल्या. रामोजीराव यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये बस्तर विभागात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत काल सात  माओवादी ठार झाले. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवर ही चकमक झाल्याचं पोलिसांनी  सांगितलं. या माओवाद्यांचे  मृतदेह ताब्यात घेतल्याचं दंतेवाडाचे पोलिस अधीक्षक गौरव राय यांनी सांगितलं. गुप्तचर सूत्रांकडून माहिती मिळाल्यानंतर, जिल्हा राखीव सुरक्षा  दल आणि इंडो -तिबेटियन सीमा पोलिसांच्या संयुक्त पथकानं शोध मोहिमेला सुरुवात केली, त्यावेळी ही चकमक झाली. या कारवाईत तीन जवानही जखमी झाले आहेत.

**<><><><><>**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज टेक्सास इथं झालेल्या सामन्यात बांगलादेशनं श्रीलंकेवर दोन गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या श्रीलंकेनं ९ गड्यांच्या बदल्यात १२४ धावा केल्या. बांगलादेशनं हे आव्हान १९ व्या षटकातच  १२५ धावा काढून पूर्ण केलं. तर दुसऱ्या एका सामन्यात अफगाणिस्ताननं न्यूझीलंडला ८४ धावांनी नमवलं.

**<><><><><>**

लंडनमध्ये सुरू असलेल्या एफआयएच हॉकी प्रो लीगमध्ये भारताचा सामना आज जर्मनीशी होणार आहे. यापूर्वी झालेल्या सामन्यात भारतानं जर्मनीचा ३-० असा पराभव केला होता. भारतीय संघाच्या आतापर्यंतच्या कामगिरीबद्दल बोलताना

उपकर्णधार हार्दिक सिंग म्हणाला की, सर्व खेळाडूंनी खेळाचं चांगलं प्रदर्शन केलं आहे, मात्र अजूनही काही बाबतीत सुधारणा करणं आवश्यक आहे. उर्वरित सामन्यांमध्ये आक्रमकपणे सुरुवात करणं आणि सर्वोत्तम संयोजन हा भारतीय संघाचा उद्देश असेल, असंही हार्दिक सिंग म्हणाला. १४ सामन्यांतून २४ गुणांची कमाई केली असल्यामुळं भारतीय पुरुष संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत काल पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात स्पेनच्या कार्लोस अल्काराजने इटलीच्या यानिक सिनरचा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य फेरीत चौथ्या मानांकित जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हने सातव्या मानांकित नॉर्वेच्या कॅस्पर रुडचा पराभव करून अंतिम फेरी गाठली आहे. अंतिम फेरीत उद्या अल्काराझचा सामना अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होणार आहे. महिला एकेरीच्या अंतिम फेरीचा सामना आज पोलंडची इगा श्वियांतेक आणि इटलीची जास्मिन पाओलिनी यांच्यात होणार आहे. २१ वर्षांच्या कार्लोस अल्काराझने यानिक सिनरला हरवून त्याची पहिली फ्रेंच ओपन अंतिम फेरी गाठली आहे तसचं तीनही ग्रँड स्लॅम विजेतेपदाचा सामना गाठणारा तो सर्वात तरुण टेनिसपटू ठरला आहे.

**//<><><><><>//**